**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAR-APR, 2022, VOL- 9/70*
*doi.org/10.21922/srjis.v9i70.10082*

# शिक्षकाचे व्यक्तिमत्व समृद्धी आणि व्यावसायिक विकास विषयक अपेक्षा व बदलते संदर्भ

**सज्जन थूल**[1], **Ph. D. & मनीषा गुलाबराव पाटील**[2]
[1]मार्गदर्शक, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
[2]संशोधक विद्यार्थी, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

**Paper Received On:** 25 APR 2022
**Peer Reviewed On:** 30 APR 2022
**Published On:** 1 MAY 2022

***Abstract***

आजच्या विज्ञान युगात सर्वच क्षेत्रात प्रचंड गतीने बदल होत आहेत. प्रत्येक क्षेत्रात आश्चर्यजनक परिवर्तने घडून येतांना दिसत आहेत. समाजाच्या गरजा व अपेक्षा बदलत आहेत. त्याच बरोबर समस्यांचे स्वरुप व क्षेत्र हे व्यापक होत आहे. अशा परिस्थितीत शिक्षण हे मध्यस्थानी आलेले आहे. आपली शिक्षण पध्दती विद्यार्थी केंद्रित असली तरीही शिक्षकाचे महत्व आजही पूर्णत्वाने टिकून आहे. शिक्षक फक्त विद्यार्थ्यांना शिकवित नसतो तर तो विद्यार्थ्यांना भविष्यासाठी घडवित असतो. असा हा शिक्षक जुन्या विचारसरणीचा असून चालणार नाही तर तो काळानूसार व येणाऱ्या नवनविन विचार प्रवाहांच्या अनुसार बदलला पाहिजे. विश्व बदलायचे असेल तर राष्ट्र बदलले पाहिजे, राष्ट्र बदलायचे असेल तर समाज बदलला पाहिजे व समाज बदलायचा असेल तर व्यक्ती बदलायला पाहिजे. अर्थातच व्यक्ती हा फक्त शिक्षणातूनच बदलू शकतो व शिक्षणातून व्यक्ती बदलण्याचे सामर्थ्य फक्त शिक्षकातच आहे. विश्व बदालाची प्रक्रिया ही शिक्षकापासून सुरु होत असते. यासाठी शिक्षकाने स्वत:ला सर्वांगिण विकसित करणे, सतत अध्ययनशील असणे, आपल्या कौशल्यांचा विकास करणे, स्वत:चे मुल्यमापन करणे, ज्ञानाच्या कक्षा रुंदावणे, राष्ट्रीय विकासातील स्वत:चे योगदान समजून घेणे व आजचा विद्यार्थी हा राष्ट्राचे भविष्य आहे या दृष्टीने विद्यार्थी विकासासाठी झटणारा व तळमळ करणारा अशी स्वता:ची प्रतिमा व आदर्श निर्माण करणे आवश्यक आहे. अर्थातच या आधुनिक बदलत्या काळानुसार शिक्षकाने स्वत:चे व्यक्तिमत्व समृध्द करण्याबरोबर आधुनिक काळाशी सुसंगत व्यावसायिक विकास करणे आवश्यक झाले आहे.

**संबोध शब्द** : शिक्षक व्यक्तिमत्व समृद्धी, शिक्षक क्षमता क्षेत्रे, व्यावसायिक विकास, शैक्षणिक उपक्रमशीलत, मूल्यमापन

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- **प्रस्तावना**

वर्तमान समाजाच्या अपेक्षा सतत बदलत आहेत. शिक्षण क्षेत्राला पुरक असे नव-नविन तंत्रज्ञान व पद्धती विकसित होत आहेत. त्यानुसार शिक्षकालाही स्वताल अद्ययावत व परिपूर्ण ठेवणे अपेक्षित आहे. 21 व्या शतकात शिक्षकाची भूमिका सातत्याने बदलत आहे. वर्तमान काळात विद्यार्थांना अभ्यासासाठी अनेक स्त्रोत उपलब्ध आहेत. शिक्षकाच्या अध्यापनाचे मूल्यमापन करण्याची क्षमता त्यांच्यात आलेली आहे. त्यामुळे पारंपारिक अध्यापन आता कुचकामी ठरत आहे. शिक्षक आता नविन भूमिका स्वीकारण्यास व निभावण्यास तयार असला पाहिजे. विद्यार्थ्यांना पुरक साहित्य पुरविणारा, सुविधा देणारा, मार्गदर्शन करणारा, प्रयोगशील, तंत्रज्ञानाचे ज्ञान असणारा, सर्जनशील इत्यादी विविध गुण शिक्षकासाठी आवश्यक झाले आहेत. सदर लेखात आधुनिक काळाच्या अनुषंगाने शिक्षकाच्या व्यक्तिमत्व समृद्धी व व्यावसायिक विकासाची आवश्यकता यावर प्रकाश टाकणार आहोत.

- **शिक्षक व्यक्तिमत्व समृध्दी : स्वरुप व संकल्पना**

शिक्षक व्यक्तिमत्व समृध्दीविषयी प्रत्येकाची विचारसरणी व संकल्पना वेगळी असू शकते. आता पर्यंत शिक्षकाने विद्यार्थ्यांना उत्तम शिकवावे, आदर्श असावे, विविध गुण त्यांच्यात असावेत असे अपेक्षित होते. मात्र आता काळ बदलला आहे. अनेक नवीन क्षमता व गुणवैशिष्टये ही शिक्षकात असणे आता आवश्यक आहे. या क्षमता आधुनिक विचार प्रवाहाला धरुन आहेत. समृध्द व्यक्तिमत्वाच्या काही वैशिष्टयांच्या आधारे आपण ही संकल्पना स्पष्ट करु शकतो. त्यात खास वैशिष्टये म्हणजे शिक्षकाचे निरोगी समायोजन होय. यातून असे म्हणता येईल की, सतत अध्ययनशील, अधिक गतिमान, क्रियाशील व सर्जनशील, अनेक कृतीमध्ये सहभागी होणारे व सहकार्यशील, विविध प्रकारचे छंद व आवडी जोपासणारे, व्यापक विचारसरणी व मनोवृत्ती असणारे, आवडीत नाविण्य असणारे, मूलतः आधुनिक, व्यापक व विशाल दृष्टिकोन असलेले व आधुनिक बदलांनुसार स्वतःला बदलणारे व्यक्तिमत्व म्हणजे समृध्द व्यक्तिमत्व होय."1 (आहेर हिरा, 2010)

त्याचप्रमाणे अशी अनेक कार्ये व कृती आहेत ज्यांचा शिक्षक व्यक्तिमत्व समृध्दी या संकल्पनेत समावेश होतो. यात विद्यार्थ्यांना नवनवीन व आधुनिक ज्ञान देण्यासाठी सतत संशोधन करणे, नाविन्याचा शोध घेणे, विविध प्रकल्प राबविणे, विद्यार्थ्यांच्या भावना जोपासणे, स्वतःवर असलेली जबाबदारी आत्मविश्वासपूर्वक पार पाडणे, प्रत्येक कार्याचे योग्य पूर्वनियोजन असणे, व्यवसाय निष्ठा टिकविणे, शाळेची उच्च परंपरा विविध कृतीतून जोपासण्याचा प्रयत्न करणे तसेच शाळा, समाज व कुटूंबाकडून अपेक्षित असलेल्या कर्तव्यांची पूर्तता करण्यासाठी सतत प्रयत्नशील असणे. इ. विविध कृतींचा समावेश शिक्षक व्यक्तिमत्व समृध्दी मध्ये होतो.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- **शिक्षक व्यक्तिमत्व समृध्दीचे महत्व**

1) शिक्षक हा विद्यार्थी घडवित असतो. त्यामुळे शिक्षक हा देशाच्या विकासात सर्वात महत्वाचे योगदान देणारा असतो. अशा या शिक्षकाचे व्यक्तिमत्व आजच्या या स्पर्धेच्या युगात व विज्ञान युगात सर्वांग दृष्टीने समृध्द असणे व विकसित असणे आवश्यक आहे. आधुनिक काळानुसार सामाजिक विचारसरणी बदलत आहे. फक्त शाळेतूनच ज्ञान होत नाही तर तो समाजाकडूनही बरेच नविन विचार घेत असतो. तसेच इंटरनेटचा माध्यमाने घरबसल्या सर्व जगातील माहिती मिळविता येत आहे. अशा परिस्थितित शिक्षकाने मागे राहून चालणार नाही. तर बदलणारे विचार समजून घेऊन त्यांचा स्विकार करुन ते विद्यार्थ्यांना वेळोवेळी देणे आवश्यक आहे."2 (पेंडके प्रतिभा, 2010) यासाठी शिक्षकाचे व्यक्तिमत्व समृध्द असणे महत्वाचे आहे.

2) समाजावर व विद्यार्थ्यांवर अनेक घटकांचा प्रभाव होत असतो. या प्रभावामुळे कधी-कधी विद्यार्थी चूकीच्या दिशेला जातात अथवा चूकीच्या अनुकरणाकडे वळतात. यामुळे विद्यार्थी भरकटतात. यासाठी जर शिक्षकाचे विचार व आचार प्रभावी असतील, शिक्षकाचे व्यक्तिमत्व प्रभावी असले, विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याची क्षमता शिक्षकात असेल असा शिक्षक विद्यार्थ्यांना योग्य दिशा देऊ शकतो.

3) अलिकडच्या काळात अनेक शैक्षणिक समस्यामुळे तसेच विविध कारणांमुळे शिक्षक तणावात येत आहेत. नकारात्मक वृत्ती वाढत आहे. शिक्षकी व्यवसायावरचा विश्वास ढासळत चालला आहे. यातून निर्माण होणारी असहायता व निष्क्रीयता चिंताजनक आहे. यातून शिक्षकाला बाहेर काढण्यासाठी व्यक्तिमत्वाची समृध्दता महत्वाची आहे.

4) शैक्षणिक कार्य करतांना नवनवीन समस्या निर्माण होत असतात. अनेकवेळा या समस्यांमध्ये शिक्षक गुरफटतो व आपल्या कार्यापासून दूर जात असतो. अशा या येणाऱ्या विविध समस्या समजून घेणे, निराश न होता त्या समस्या सोडविण्यासाठी नवनवीन मार्ग शोधणे इ. चा सतत विचार करणे व आपल्या क्षमता विकसित करणे आवश्यक आहे. अर्थातच त्यासाठी शिक्षकाचे व्यक्तिमत्व समृध्द असणे महत्वाचे आहे.

5) आजच्या काळात संघर्ष वाढला आहे. स्पर्धात्मक वृत्ती वाढली आहे. प्रत्येक जण यशासाठी विविध मार्गांचा अवलंब करीत आहे. अशा या संघर्षमय वातावरणात विद्यार्थ्यांना त्या दृष्टीने विकसित करणे, सतत प्रेरणा देणे, भविष्यासाठी सक्षम व आत्मविश्वासपूर्ण विचारसरणी विद्यार्थ्यांमध्ये रुजविणे, विकासासाठी विविध मार्गाचे मार्गदर्शन करणे, भविष्यातील रोजगाराच्या विविध वाटा व शिक्षणाच्या विविध संधीचे मार्गदर्शन शिक्षकाने करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये आंतरराष्ट्रीय दृष्टिकोन विकसित करण्याची गरज निर्माण झाली आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता शिक्षकाचे व्यक्तिमत्व समृध्द असणे काळाची गरज ठरले आहे."3 (सामुद्रे संध्या, 2012)

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

6) शिक्षक हा समाजाचा एक जबाबदार घटक आहे. त्यामुळे समाजाला दिशा देण्याचे कार्य शिक्षकाला करावे लागते. समाजासाठी विविध कार्यात व उपक्रमात भाग घेणे, सामाजिक प्रतिनिधीत्व करणे व सामाजिक बांधिलकी टिकविणे हे शिक्षकाचे आद्यकर्तव्य आहे. यामुळे शिक्षकाचे कार्य हे समाजासाठी पोषक व हिताचे व सलोख्याचे असणे आवश्यक आहे. अशा विविध गुणांनी परिपूर्ण असणे अर्थातच समृध्द असणे महत्वाचे आहे.

- **शिक्षक क्षमता क्षेत्रे** - समृध्द व सक्षम शिक्षक तयार व्हावा यासाठी राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने दहा शिक्षक क्षमता क्षेत्रे सुचविली आहेत. त्या क्षमतांवर शिक्षकाने प्रभुत्व संपादन केल्यास शिक्षकाचे व्यक्तिमत्व समृध्द होते अशी अपेक्षा आहे.

**1) संदर्भ क्षमता** - शिक्षकाने सतत अध्ययनशील असावे. यात शिक्षकांची भुमिका समजावून घेणे, शैक्षणिक धोरणे अभ्यासणे, समस्यांचा अभ्यास करुन त्यांना जबाबदार घटकांची माहिती करुन घेणे, समाजात शिक्षणाचा विकास व त्यातील शिक्षकाची भूमिका ज्ञान होणे आवश्यक आहे. घटनेतील शिक्षणविषयक तरतुदी माहित करुन घेणे आवश्यक आहे. दैनंदिन वर्तमानपत्रांचे वाचन करुन नवनवीन शैक्षणिक विचार प्रवाहांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. एकूणच शिक्षकाने शैक्षणिक तत्वज्ञान, प्रशासन व कार्यपध्दती या बाबतीत संदर्भ संपन्न असावे.

**2) संबोध क्षमता** - शिक्षण क्षेत्रात येणाऱ्या विविध संबोधांची माहिती शिक्षकाला असावी. नवनवीन पध्दतीचे विस्तृत अध्ययन होण्यासाठी तत्वज्ञान, समाजशास्त्र, मानसशास्त्र, तंत्रज्ञान यांची माहिती असावी. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेचे ज्ञान असावे. शिक्षणाच्या महत्वाच्या उद्दिष्टांचे व गाभा घटकांचे आकलन झालेले असावे. त्याचबरोबर प्रेरणादायी सराव, एकाग्रता, रुची, अभिवृत्ती अशा विविध बाबींचा अध्ययन प्रक्रियेवर कसा परिणाम होतो याची जाणीव हवी.”4 (पाटील विनोद, 2020)

**3) आशयज्ञान क्षमता** - शिक्षकाचे आशय ज्ञान हे परिपूर्ण असावे. आशयज्ञानाबरोबर त्याच्याशी संबंधित विविध प्रकारच्या घटकांचा व परिस्थितींचा तसेच माहितीचा अभ्यास असणे आवश्यक असते. आशयानुसार विविध अध्यापन पध्दती, साधने, कौशल्ये व सादरीकरण याच्यावरही शिक्षकाचे प्रभुत्व असावे.

**4) शैक्षणिक व्यवहार क्षमता** - या क्षमतेमध्ये नियोजन, अध्ययन-अध्यापन व मूल्यमापन इ. गोष्टींवर विशेष भर आहे. विविध शिक्षणपध्दती, तंत्रे, वार्षिक नियोजन, घटक नियोजन, पाठ नियोजन, घटक चाचणी, वर्गातील शैक्षणिक व्यवहार, कौशल्य इ. बाबतीत अध्ययनपूर्वक नियोजन हवे. विद्यार्थ्यांची अध्ययन प्रभुत्व पातळी गाठण्यासाठी शैक्षणिक व्यवहाराचे शाब्दीक, अशाब्दीक मार्ग अवलंबले जावेत.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**5) शैक्षणिक उपक्रम क्षमता** - विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांचे महत्व जाणून तसेच कौशल्ये, प्रवृत्ती, नितीमूल्ये या बाबत विचार करुन विविध उपक्रमांचे आयोजन करण्याची क्षमता अवगत व्हावी.

**6) शैक्षणिक साहित्य निर्मीती व वापर क्षमता** - पाठयपुस्तकातील आशयाचे परिणामकारक व प्रभावीपणे अध्यापन करण्यासाठी उपयुक्त शैक्षणिक साहित्याची निर्मिती करण्याची क्षमता असावी. तसेच शैक्षणिक साहित्य आशयानुसार योग्य वेळी व उद्दिष्टांनुसार वापरण्याचे कौशल्य अवगत असावे."5 (करंदीकर सुरेश, 2003)

**7) मूल्यमापन क्षमता** - मूल्यमापन पध्दतीचा वापर करुन घेऊन सातत्याने व व्यापक अर्थाने मूल्यमापन करता येण्यासाठी विविध चाचण्या नोंदी कराव्यात, क्षमताधिष्ठीत मूल्यमापनासाठी सकारात्मक दृष्टिकोन विकसित करावा.

**8) व्यवस्थापन क्षमता** - प्रत्येक शिक्षक हा त्या वर्गाचा किंवा विद्यार्थी समूहाचा व्यवस्थापक असतो. शालेय व्यवस्थापन व वर्ग व्यवस्थापन यांची सद्यस्थिती समजावून घेवुन अध्ययन व अध्यापनास व दर्जेदार शिक्षणासाठी उपयुक्त अशा वातावरण निर्मीतीसाठी सुयोग्य व्यवस्थापन कौशल्य अवगत असणे आवश्यक आहे.

**9) पालक संपर्क क्षमता** - शाळेव्यतिरिक्त बराच काळ विद्यार्थी आपल्या कुटुंबात पालकांसोबत असतो. यासाठी शिक्षकांजवळ पालकांची स्थिती व भूमिका समजावून घेण्याची क्षमता असावी. पालक-शिक्षक संघात पालकांच्या समस्यांबाबत विचारविनिमय करुन विविध उपक्रमांचे आयोजन करण्याचे कौशल्य हवे.

**10) समाज संपर्क क्षमता** - शिक्षकाला सामाजिक बांधिलकीची, जबाबदारीची व कर्तव्याची जाणीव असावी. वेळोवेळी समाजात एकरुप होऊन आपले कार्य करावे. शैक्षणिक उद्दिष्टये सफल करण्यासाठी समाजाचे सहकार्य मिळविण्यासाठी शिक्षकात समाज संपर्क क्षमता हवी."6 (पांडेय रामशकल, 2003)

शिक्षकाच्या प्रभावी व्यक्तिमत्वावरच शिक्षकाचे शैक्षणिक कार्य टिकून असते. त्याचबरोबर आधुनिक काळातील नवनवीन तंत्रज्ञान, पध्दती, संगणक, इंटरनेट, माहितीचे विविध स्त्रोत इ. च्या आधारे स्वत:ला बदलांच्या प्रक्रियेत समावून घेऊन आपल्या ज्ञानाचे अद्ययावतीकरण करणे व त्यातून अध्ययन-अध्यापन प्रक्रिया सुलभ व सोपी करणे आवश्यक आहे. कारण शिक्षकाचे व्यक्तिमत्व चांगले असेल तरच अध्ययन - अध्यापन प्रक्रिया सर्वंकष होऊन शिक्षणाचे काम चांगल्या प्रकारे होईल. यासाठी शिक्षकाने व्यक्तिमत्व समृध्दीसाठी आवश्यक त्या विविध मार्गांचा अवलंब करणे महत्वाचे आहे.

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

- **शिक्षकांचा व्यावसायिक विकास**

आजच्या 21 व्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये वेगवान बदल आणि स्थित्यंतरे घडून येत आहेत. त्यामुळे शिक्षणाकडून समाजाच्या अपेक्षा व मागण्याही वाढत चाललेल्या आहेत. आज जगातील ज्ञान आणि माहिती कल्पनातीत वेगाने वाढत आहे. आणि विविध माध्यमातून हे ज्ञान सहजासहजी उपलब्ध होत आहे. शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींनी ह्याचे भान ठेवले नाही तर थोड्याच काळात त्यांच्यावर निरुपयोगी म्हणून शिक्का मारला जाईल. अद्ययावत ज्ञानाचा आणि माहितीचा शोध व उपयोग करुन घेण्याची नवी कौशल्ये प्राप्त केल्याशिवाय ह्या माहितीच्या महाजालातून आवश्यक, योग्य आणि उपययुक्त माहितीची निवड व उपयोग ते करु शकणार नाहीत. आता शिक्षकांपुढे स्वताचा व्यावसायिक विकास करून घेण्यासाठी अनेक स्रोत व सुविधा उपलब्ध झाल्या आहेत."7 (मंगल एस. के., मंगल उमा, 2017)

- **शिक्षकांचा व्यावसायिक विकास : स्वरुप आणि व्याप्ती**

शिक्षण क्षेत्रात शिक्षकांचे मुख्य कार्य हे व्यावसायिक स्वरुपाचेच आहे. पण ज्या शिक्षण पध्दतीत शिक्षक कार्यरत आहेत ती पध्दती व्यावसायिकतेशी विसंगत दिसून येते. म्हणजे शिक्षकांना एक परिपूर्ण व्यावसायिक म्हणून आपली भुमिका बजावता येत नाही. असे असले तरी अध्यापन ही शिक्षकांची प्रमुख जबाबदारी आहे. हे लक्षात ठेवून ती दीर्घकाळ परिणामकारक आणि प्रभावी राहील यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. शिक्षकांच्या व्यावसायिक विकासात पुढील घटकांचा समावेश होतो. (1) विषय (2) अध्यापन कौशल्य (3) भावनात्मक परिपक्वता (4) बांधिलकी (5) उत्तरदायित्वाची जाणीव आणि दृढता.

ली शुलमन (Shulman,1986) यांनी शिक्षकाला आवश्यक असलेल्या ज्ञानाचे तीन भागात वर्गीकरण केले आहे.

**1) विषय ज्ञान** - यात अध्यापनाचा विषय अभिप्रेत आहे. जो विषय आपण शिकवितो त्यातील संकल्पना, सिध्दांत, सामान्य विधाने आणि पाठयपुस्तकावर आधारित त्या विषयाची व्याप्ती एवढयापूरतेच आपले विषयज्ञान मर्यादित न ठेवता त्या पलीकडे जाऊन काही गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. याची जाणीव असणे महत्वाचे आहे. या विषयज्ञानाचे स्रोत कोणते? त्यातील महत्वाचे सिध्दांत कोठून आले? कालांतराने त्यात काय बदल झाले? या बदलांबद्दलचे निर्णय कोण घेतो? अशा प्रकारचे प्रश्न विचारणे व त्यांची उत्तरे शोधणे हे देखील विज्ञानाचे एक महत्वाचे अंग आहे. प्रत्येक प्रश्नाचे निश्चित आणि अंतिम उत्तर मिळेलच ह्याची जरी खात्री नसली तरी त्या दृष्टीने विचार करुन जमेल ते प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**2) अध्यापन संबंधित विषय ज्ञान** - यात आशयाची रचना आणि क्रम, विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून संभाव्य अडचणी, आशयासंबंधी काही गैरसमज आणि ते दूर करण्याचे मार्ग इत्यादी गोष्टींचा समावेश होतो.

**3) अध्यापनशास्त्राचे ज्ञान** - यात अध्यापनाच्या विविध पध्दतीचे ज्ञान, त्यातून निवड करण्यासाठी निकष किंवा मार्गदर्शक तत्वे यांचा समावेश आहे. अध्ययन-अध्यापनासंबंधी आधुनिक ज्ञान आणि कौशल्ये संपादन करणे ही प्रामुख्याने बौध्दिक प्रक्रिया आहे. ती आवश्यक असली तरी परिपक्व व्यावसायिकतेच्या भूमिकेला पुरेशी नाही. व्यावसायिकांची आंतरक्रिया ही मानवाशी होते आणि ती अर्थपूर्ण होण्यासाठी भावनात्मक गुणांची जोड महत्वाची आहे. आदर आणि विश्वास यावर आधारित परस्पर संबंध निर्माण करणे, त्यांची जोपासना करणे ही परिपक्व व्यावसायिकांची लक्षणे समजली जातात. समाज व्यासयिकांना विशिष्ट सवलत आणि प्रतिष्ठा बहाल करीत असतो. पण त्याचबरोबर व्यावसायिकांकडून समाजाला काही खास अपेक्षा असतात. त्या पूर्ण करण्यात कुठलीही तडजोड करणार नाही असा संकल्प परिपक्व व्यावसायिकांच्या सेवा कार्यातून व्यक्त होत असतो."8 (माथुर एस. एस., पाठक पी. डी., 2016)

- **शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी नविन दिशा**

1) शाळा हेच शिक्षकांच्या विकासाचे प्रमुख केंद्र असावे. अलीकडे सर्वत्र शाळाधिष्ठीत व्यवस्थापन या संकल्पनेचा पुरस्कार होत असलेला दिसतो. राष्ट्र किंवा राज्य पातळीवर आयोजित केलेले कार्यक्रम फारसे परिणामकारक ठरत नाहीत. हे अनुभवातूनच सिध्द होत असलेले दिसत आहे. संदर्भाचा अभाव हे याचे मुख्य कारण मानले जात आहे. शाळांच्या आणि शिक्षकांच्या गरजा त्यांच्या संदर्भानुसार ठरत आणि बदलत असतात. प्रत्येक शाळेने स्वत:च्या गरजांवर आधारित शिक्षकांच्या विकास कार्यक्रमाचे स्वरुप व त्यातील प्राधान्यक्रम ठरवायला हवा. शिक्षकांचा विकास हे शाळेचे एक महत्वाचे अंग बनले पाहिजे. ज्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या अध्ययनात गुणात्मक सुधारणा घडवून आणण्यासाठी शाळा सतत प्रयत्नशील असते त्याचप्रमाणे शिक्षकांचा विकास घडवून आणण्यासाठी तिने प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. ह्या दोन प्रक्रिया परस्परसंबंधी असल्यामुळे आणि हे संबंध साधन आणि साध्य अशा स्वरुपाचे असल्यामुळे दोन्ही प्रक्रिया सतत आणि समांतर घडत असायला पाहिजे.

2) संशोधन आणि सराव यात देवाण-घेवाण होणे व त्यासाठी या दोन्ही क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यावसायिकांमध्ये भागीदारी निर्माण होणे गरजेचे आहे. संशोधनामुळे प्रकाशात आलेली ज्ञानाची नवी शिखरे आणि सरावाची वस्तूस्थिती यातील अंतर वाढत असते. हे अनुचित नसून उचित आहे हे लक्षात ठेवायला पाहिजे. याउलट शिक्षक विकासाचा मुख्य उददेश हे अंतर कमी करणे असा आहे. संशोधन आधारित नवे ज्ञान जेव्हा शिक्षकांपर्यंत पोहचते तेव्हा आपोआपच अंतर कमी होते आणि शिक्षक जेव्हा

या ज्ञानावर आधारित आपल्या अध्यापनाकार्यात सुधारणा करतात तेव्हा त्या संशोधनाचा खराखुरा उपयोग झाला असे म्हणता येते."9 (www.7mindset.com)

3) व्यावसायिक विकासाच्या संदर्भात शिक्षक या शब्दाची व्याख्या अतिशय व्यापक करायला पाहिजे. इंग्रजी भाषेत Teacher आणि Educator असे दोन शब्द प्रचलित आहेत. कधी-कधी ते शब्द समानार्थी म्हणून वापरले जात असले तरी Educator हा शब्द फार व्यापक आहे आणि त्यात पर्यवेक्षक, प्रशासक, व्यवस्थापक, ग्रंथपाल व इतर शैक्षणिक व्यावसायिक यांचा समावेश होतो. Educators हा शब्द Professionals या अर्थाने वापरला जातो आणि विकास कार्यक्रम हे या सर्वांनाच आवश्यक आहेत. हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. प्रचलित शिक्षक व्यावसायिक विकास कार्यक्रमात हा विचार अभावानेच जाणवतो. शिक्षकांसाठी आयोजित कार्यक्रमात इतर Education Professionals भाग घेत नाहीत. एवढेच नव्हे तर मुख्याध्यापक देखील अपवादानेच हजर असलेले दिसतात. आपण मुख्याध्यापक आहोत हे विसरुन अध्यापनाशी आपला काहीच संबंध नाही अशीच अनेकांची धारणा झालेली दिसते. आपल्या पदाची आणि त्यातूनच व्यक्त होत असलेल्या कार्यक्षेत्रांची अतिशय संकुचित व्याख्या ही मंडळी करीत असावी. या मानसिकतेला पोषक आणखी एक कारण सांगता येईल. आपली शिक्षणपध्दती ही प्रशासकीय श्रेणीबध्द, अधिकारावर आधारीत असल्यामुळे आपल्या विशिष्ट श्रेणीबध्द प्रतिष्ठेबदद्ल लोक फार संवेदनशील असतात. कनिष्ठांसाठी आयोजित कार्यक्रमात आपली उपस्थिती योग्य ठरणार नाही असे समजले जाते. व्यावसायिक संस्कृति मध्ये हे भेद गौण मानले जातात. याची जाणीव प्रशासकीय अधिकाऱ्यांना असत नाही.

4) शैक्षणिक व्यावसायिकांच्या विकास कार्याचा विचार करतांना एक महत्वाची गोष्ट सतत लक्षात ठेवणे आवश्यक आहे. पद आणि भूमिका यात जरी भिन्नता असली शैक्षणिक या शब्दातून व्यक्त होणारा संदर्भ हा सर्वांसाठी सारखाच आहे. यादृष्टीने सर्व स्तरावरील शैक्षणिक व्यावसायिकांना अत्यावश्यक असलेले ज्ञान आणि कौशल्ये ही निश्चित झाली पाहिजेत."10 (www.questia.com) यात शाळेची परिणामकारकता आणि गुणात्मक विकास घडवुन आणण्याच्या दृष्टीने व्यवस्थापन शास्त्र व तत्सम ज्ञानशाखातून उपलब्ध झालेल्या महत्वाच्या संकल्पना, गृहीतके, सिध्दांत आणि प्रात्यक्षिके यांचा समावेश करणे गरजेचे आहे.

- **समारोप**

एकंदरीत असे म्हणता येईल की शिक्षकाने आपल्या अध्यापनाशिवाय जुने-नविन अनुभवातील परस्परसंबंध जोडणे, व्यावसायिक अध्ययनाची ध्येय निश्चित करणे, व्यावसायिक ज्ञान व कौशल्ये विकसित करण्यासाठी संधीचा पाठपुरावा करणे, आपल्या व्यावसायिक कार्यपध्दतीच्या यशस्वीतेसाठी स्थानिक समाजाचा अभ्यास करणे, नविन तंत्रज्ञान अवगत करणे, त्यांच्या

*Copyright © 2022, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

कार्यक्रमात सहभागी होणे, विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, पालकांना पाल्यांच्या अध्ययनात आणि शालेय कृतिकार्यक्रमात सहभागी होण्यास प्रवृत्त करणे, शालेय कार्यात योगदान, शाळेची ध्येय धोरणे साकार करण्यासाठी प्रयत्न करणे, संघ भावनेतुन इतर शिक्षकांना सहकार्य करणे, विविध व्यावसायिक जबाबदाऱ्यामध्ये समतोल साधने आणि विद्यार्थ्यांप्रती बांधिलकी ठेऊन उच्च दर्जा निर्माण करण्याचे प्रयत्न करणे इत्यादी सर्व गोष्टी आपल्या व्यावसायिक विकासासाठी केलेले जाणीवपूर्वक प्रयत्न होत.

## संदर्भ सूची

डॉ. आहेर हिरा, (*2010*), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, दत्तसन्स पब्लिशर्स, नागपूर

डॉ. पेंडके प्रतिभा, (*2010*), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

डॉ. सामुद्रे संध्या, (*2012*), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर

डॉ. पाटील विनोद, *(2020),* आधुनिक शिक्षणातील आव्हाने, ऑरेंजबुक्स पब्लिकेशन्स, भिलाई

डॉ. करंदीकर सुरेश, (*2003*), शिक्षण आणि भारतीय समाज, फडके प्रकाशन, कोल्हापूर

पांडेय रामशकल, (*2003*), उदीयमान भारतीय समाज मे शिक्षक, विनोद पुस्तक मंदिर, आगरा

डॉ. मंगल एस. के., डॉ. मंगल उमा, (*2017*), अधिगम एवं शिक्षण, टंडन पब्लिकेशन्स, लुधियाना

माथुर एस. एस., पाठक पी. डी., (*2016*), शिक्षण एवं अधिगम, अग्रवाल पब्लिकेशन, आगरा

*www.7mindset.com/thoughts-on-teaching/professeional-development-in-modern-age/article/*

*www.questia.com/library/education/educational-administration/teacher-professional-development.*